दैनिक सत्यप्रभा

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठी प्रशिक्षण

नांदेड, दि. ३० : जवाहरलाल नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन सायन्स अँड टेक्नॉलॉजी रिसर्च ट्रस्ट नांदेड, कृषी विज्ञान केंद्र पोखरणी नांदेड, कृषी विभाग व आत्मा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अंतर्गत सक्षम ग्राम निर्मितीसाठी चला गाऊ गावाकडे कार्यक्रम प्रशिक्षण २९ मे रोजी कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथे देण्यात आले. यावेळी कृषी संचालक डॉ. एस. डी. मोरे अध्यक्षस्थानी तर जिल्हा कृषी अधिक्षक भाऊसाहेब बराटे, आत्माचे प्रकल्प संचालक शिरफुले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी डॉ. राम पंजाबराव देशमुख (चिकाळेकर) यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्यात आली.

मुख्य आवृत्ती
1 मे 2024 पृष्ठ क्रमांक 6
द्वारा समर्थित: Way2smart